<u>प्रशासकीय अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती-</u>
श्री.मि.व.टांकसाळे, सहनिबंधक, सहकारी संस्था.

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग ,
शासन आदेश क्र.प्रतिनि-२०१७/प्र.क्र.४५/आस्था-२
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २७ नोव्हेंबर,२०१७.

वाचा:- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन-१२,दि.१७.१२.२०१६
२) मराठी भाषा विभाग, पत्र क्र.प्रतिनि-२०१७/प्र.क्र. २१/आस्था-२, दि.२७.१.२०१७.
३) श्री.मि.व.टांकसाळे, सहायक प्राध्यापक, यशदा, पुणे यांचे दि.७.३.२०१७ चे पत्र.

## <u>शासन आदेश</u>

संदर्भ २ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेतील प्रशासकीय अधिकारी या पदाकरिता इच्छुकता मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन संदर्भ ३ नुसार अर्ज प्राप्त झाला आहे. सदर अर्जाची छाननी संदर्भ १ तसेच अन्य तरतुदींना अनुसरुन करण्यात आली असून सदर पदावर श्री.मि.व.टांकसाळे, सहनिबंधक, सहकारी संस्था (सध्या सहायक प्राध्यापक, यशदा, पुणे) यांची २ वर्षांसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे. श्री.मि.व.टांकसाळे हे ज्या दिवशी प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था या पदावर हजर होतील त्या दिवसापासून त्यांना प्रतिनियुक्ती कालावधी सुरु होईल. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ४० व परिशिष्ट २ नुसार तसेच वित्त विभाग आणि सामान्य प्रशासन विभाग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना विचारात घेऊन प्रस्तुत प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्ती तयार करण्यात आल्या असून त्या सोबतच्या प्रपत्र-१ मध्ये दिल्या आहेत.

श्री.मि.व.टांकसाळे यांनी प्रशासकीय अधिकारी या पदाचा कार्यभार श्रीमती नंदा मा.राऊत, अवर सचिव, मराठी भाषा विभाग यांच्याकडून घ्यावा व तसे संचालक, राज्य मराठी विकास संस्था

यांच्यामार्फत शासनास कळवावे. श्री.टांकसाळे, यांनी पदभार स्वीकारल्यानंतर श्रीमती नंदा मा.राऊत यांच्याकडील सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार आपोआपच संपुष्टात येईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०१७११२७१२५६५११५३३** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aparna Arvind Gawde

Digitally signed by Aparna Arvind Gawde
Date: 2017.11.28 12:45:07 +05'30'

(अपर्णा अ. गावडे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. श्री.मि.व.टांकसाळे, सहनिबंधक, सहकारी संस्था (सध्या सहायक प्राध्यापक, यशदा, पुणे)
२. श्रीमती नंदा मा.राऊत, अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.
२. अप्पर मुख्य सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मंत्री महोदयांचे (मराठी भाषा विभाग) खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, यशदा, पुणे.
६. निबंधक व सहकार आयुक्त, सहकारी संस्था, पुणे.
७. प्रधान सचिव (मराठी भाषा विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.
९. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. निवड नस्ती.

**प्रपत्र-१**

## मराठी भाषा विभाग , शासन आदेश क्रमांक-प्रतिनि-२०१७/प्र.क्र.४५/आस्था-२, दि.२७.११.२०१७ चे सहपत्र

१) **प्रतिनियुक्तीचा कालावधी** :- संबंधित अधिकाऱ्याची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम ४० मधील तरतुदीनुसार प्रतिनियुक्तीचा कालावधी हा रुजू झाल्यापासून दोन वर्षे इतका असेल.

अ) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनास आवश्यक वाटली तर त्यांना त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी स्वीयेतर सेवेतून केव्हाही परत बोलावण्याचा हक्क शासनास असेल.

ब) त्यांच्या सेवेची आवश्यकता राज्य मराठी विकास संस्था यांना नसेल तर त्यांना शासन सेवेत परत पाठविण्याची मुभा संस्थेस राहील. मात्र तत्पूर्वी किमान तीन महिने अगोदर शासनास तसे कळविणे आवश्यक राहील आणि

क) जर त्यांना आपल्या मूळ विभागाकडे परत यावयाचे असेल तर त्यांना मूळ विभागात परत येण्याची मुभा राहील. मात्र तत्पूर्वी किमान ३ महिने अगोदर शासनास तसे कळविणे आवश्यक राहील.

२) **वेतन** :- ते प्रतिनियुक्तीच्या कालावधीत "प्रशासकीय अधिकारी" हे पद धारण करतील. सदर कालावधीत त्यांनी त्यांच्या सहनिबंधक सहकारी संस्था, गट-अ या मूळ पदाच्या रु.१५६००-३९१०० (ग्रेड पे रु.६६००) या वेतनश्रेणीत मूळ विभागामध्ये जे वेतन घेतले असते ते वेतन अनुज्ञेय राहील.

३) **महागाई भत्ता** :- राज्य शासनाकडील आपले वेतनमान कायम ठेवतील किंवा स्वीयेतर सेवेतील पदाशी संलग्न असणाऱ्या वेतनमानात वेतन घेतील. त्याचप्रमाणे त्यांना राज्य शासनाकडील किंवा राज्य मराठी विकास संस्था यांच्याकडील नियमानुसार अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

४) **घरभाडे भत्ता/स्थानिक पूरक भत्ता** :- त्यांना राज्य शासनाच्या नियमांनुसार वेळोवेळी अनुज्ञेय असेल त्याप्रमाणे घरभाडे भत्ता, स्थानिक पूरक भत्ता मिळण्याचा हक्क असेल. पण राज्य मराठी विकास संस्था त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार स्वीयेतर सेवेच्या नियमान्वये हे भत्ते मंजूर करु शकेल.

५) **पदग्रहण अवधी वेतन आणि बदली प्रवास भत्ता** :- स्वीयेतर सेवेत बदली झाल्यानंतर आणि तेथून परत आल्यानंतर अशा दोन्ही वेळच्या पदग्रहण अवधीमध्ये त्यांचे वेतन व प्रवास भत्ता, राज्य शासनाच्या संबंधित नियमानुसार राज्य मराठी विकास संस्थेकडून देण्यात येतील.

६) **प्रतिनियुक्तीच्या कालावधीत कर्तव्यार्थ केलेल्या प्रवासाकरिता प्रवास भत्ता** :- स्वीयेतर सेवेत रुजू झाल्यानंतर कराव्या लागणाऱ्या प्रवासाकरिता राज्य शासनाच्या संबंधित नियमांन्वये किंवा राज्य मराठी विकास संस्थेच्या नियमान्वये प्रवास भत्ता आणि दैनिक भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

७) **रजा** :- प्रतिनियुक्तीच्या कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ हे नियम लागू असतील. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम १८ (२) मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीचा काटेकोरपणे अवलंब करण्यात यावा. स्वीयेतर सेवेतून मुक्त झाल्यानंतर त्यांना परस्पर रजेवर जाण्यास राज्य मराठी

विकास संस्थेने परवानगी देता कामा नये. म्हणजेच प्रथम शासकीय सेवेत रुजू होऊन मूळ विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून नेहमीच्या पद्धतीने त्यांनी आपली रजा मंजूर करुन घेतली पाहिजे. स्वीयेतर सेवेच्या कालावधीत अथवा अखेरीस घेतलेल्या रजेच्या कालावधीबद्दल द्यावयाच्या रजा वेतनाचा कोणत्याही पूरक भत्त्याच्या संबंधातील संपूर्ण खर्च राज्य मराठी विकास संस्थेला सोसावा लागेल.

८) **विकलांगता रजेबद्दल रजा वेतन** :- स्वीयेतर सेवेत किंवा अशा सेवेमुळे आलेल्या विकलांगतेबद्दल मंजूर करता येईल अशा रजेच्या संबंधात, अशी विकलांगता स्वीयेतर सेवा संपल्यानंतर उघडकीस आली तरीसुद्धा रजा वेतन देण्यास राज्य मराठी विकास संस्था जबाबदार असेल. अशा रजा वेतनाचा खर्च राज्य मराठी विकास संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

९) **रजा मुदती प्रवास सवलत** :- त्यांना राज्य शासनाच्या संबंधित नियमातील तरतुदीनुसार रजा प्रवास सवलत मिळण्याचा हक्क असेल. या संबंधातील खर्च राज्य मराठी विकास संस्थेस सोसावा लागेल.

१०) **वैद्यकीय सवलती** :- त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकीय उपचार) नियम, १९६१ अनुसार अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय सुविधांपेक्षा कमी प्रतीच्या नसतील अशा सुविधा मिळण्याचा हक्क असेल आणि त्यावरील खर्च राज्य मराठी विकास संस्थेस सोसावा लागेल.

११) **सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी** :- स्वीयेतर सेवेतील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाच्या सर्व रकमा संबंधित स्वीयेतर नियोक्त्याने भविष्य निर्वाह निधी लेखांकनासाठी विहित केलेल्या परिपूर्ण अनुसूचीसह थेट महालेखापाल १/२, मुंबई/नागपूर यांच्या कार्यालयात रेखांकित धनाकर्षाद्वारे अथवा स्थानिक रेखांकित धनादेशाद्वारे जमा करावी.

वरील कार्यपद्धतीचा अवलंब न करता अशा रकमा चलनाद्वारे बँकेत (कोषागाराशी निगडीत बँक) भरणा केल्यास चलनावर खातेदाराचा संपूर्ण तपशील नमूद करावा. त्याचप्रमाणे चलनासोबत सर्व तपशील भरलेली भविष्य निर्वाह निधी खात्याच्या लेखांकनास विहित केलेली अनुसूची जोडण्याची दक्षता घ्यावी. ह्या तपशीलाअभावी रकमा खातेदाराच्या खात्यात उशिराने जमा झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यालयाची तसेच संबंधित कर्मचाऱ्याची राहील.

प्रतिनियुक्तीच्या कालावधीत त्यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातून परतावा/ना-परतावा अग्रिम मंजूर करण्यास शासन (सहकार व वस्त्रोद्योग) सक्षम असल्यामुळे याबाबतचे अर्ज सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावेत.

१२) **विभागीय चौकशी :-** त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करावयाची असेल तर त्यांना, त्यांच्या मूळ विभागाकडे परत पाठविण्यात येईल. शासन त्यांना निर्वाह भत्ता देईल परंतु तो राज्य मराठी विकास संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

१३) **बोनस/सानुग्रह प्रदान** :- त्यांना बोनस किंवा सानुग्रह प्रदान अनुज्ञेय नाही. तथापि, राज्य मराठी विकास संस्थेमध्ये बोनस किंवा सानुग्रह प्रदान जाहीर करण्यात येत असल्यास (त्यांच्यावर बोनस देण्याचे कायदेशीर बंधन नसले तरीही) संस्थेने जाहीर केलेले सानुग्रह प्रदान स्वीकारण्यास त्यांना परवानगी देता येईल.

१४) **गट विमा योजना** :- त्यांच्या वेतनातून राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजनेच्या वर्गणीपोटी राज्य मराठी विकास संस्था दरमहा वसूल करील आणि ही रक्कम धनादेशाद्वारे महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडे पाठवेल. सदर रक्कम "८०११-विमा व निवृत्ती वेतन निधी इतर विमा व निवृत्तीवेतन निधी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गट विमा योजना (८०११००५९५)" या लेखाशीर्षाखाली जमा दर्शविण्यात यावी. सदर वर्गणी भरण्यास विलंब करण्यात आल्यास विलंब कालावधीत दंडनीय दराने व्याज आकारण्यात येईल.

१५) **कर्ज आणि अग्रीम**:- प्रतिनियुक्तीच्या कालावधीत, भविष्य निर्वाह निधी परतावा/ना-परतावा अग्रीम, घरबांधणी अग्रीम, मोटारकार अग्रीम, वैयक्तिक संगणक अग्रीम मंजूर करण्यास शासन सक्षम असेल. याबाबतचे त्यांचे अर्ज त्यांच्या मूळ विभागाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावेत. राज्य मराठी विकास संस्थेने त्यांना सदर अग्रिम मंजूर करु नये.

१६) **प्रतिनियुक्तीवर असताना रजेवरुन अथवा प्रशिक्षणावरुन परत आल्यानंतर नियुक्ती** :- त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत रजेवर गेल्यास किंवा प्रशिक्षणासाठी गेल्यास आणि ते धारण करीत असलेल्या पदावर अन्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आणि रजेवरुन अथवा प्रशिक्षणावरुन परत आल्यानंतर त्यांची नियुक्ती अन्य पदावर करण्यात आली तर रजा वेतन, वेतन, पदग्रहण अवधी, सक्तीचा खोळंबा कालावधी, इत्यादीबाबत सर्व खर्च रजा समाप्तीच्या अथवा प्रशिक्षण समाप्तीच्या दिनांकापासून ते अन्य पदाचा कार्यभार धारण करण्याच्या दिनांकापर्यंत राज्य मराठी विकास संस्थेला सोसावा लागेल.

१७) **प्रतिनियुक्ती कालावधीत देशात/परदेशात प्रवास** :- राज्य मराठी विकास संस्थेकडे प्रतिनियुक्तीवर असताना सदर संस्थेच्या कामासंबंधात देशात कोठेही प्रवास करावयाचा झाल्यास शासनाच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता असणार नाही. मात्र, संस्थेच्या कामाच्या संबंधात परदेशी जावयाचे असल्यास, शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल. त्याचप्रमाणे राज्य मराठी विकास संस्थेशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या शासकीय, निमशासकीय कामानिमित्त अथवा खाजगी संस्थांच्या समारंभासाठी देशांतर्गत प्रवास करावयाचा असल्यास त्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

१८) **बढती** :- प्रतिनियुक्तीवर असताना त्यांची मूळ विभागात बढती होण्याची वेळ आली असेल तर सर्वसाधारणपणे त्यांची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवू नये. तथापि सक्षम प्राधिकाऱ्याने त्यांची प्रतिनियुक्ती पुढे चालू ठेवली तर निकट-निम्नता नियमानुसार बढतीच्या पदाचे वेतन मंजूर केले जाईल आणि निकट निम्नता नियमाचा लाभ सहा महिन्यानंतर अनुज्ञेय असणार नाही.

१९) **कायमचे समावेशन** :- जर मागाहून त्यांची राज्य मराठी विकास संस्थेच्या सेवेमध्ये सामावून घेतले जाण्याची इच्छा असेल व अशा प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यास, त्यांना सामावून घेतले जाईल त्या दिनांकापासून ते शासकीय सेवेतून निवृत्त झाल्याचे मानले जाईल.

२०) **शासनाने वेळोवेळी विहीत केलेले नियम लागू करणे** :- त्यांना प्रतिनियुक्तीच्या कालावधीत शासन वेळोवेळी जे नियम करील किंवा जे कार्यकारी आदेश निर्गमित करील ते नियम कार्यकारी आदेश यथास्थिती लागू असतील.